# ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा

## सुभेदारवाडा, कल्याण (प.)

### * अहवाल सन २०१४-१५ *

जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा, सुभेदारवाडा, गांधी चौक, कल्याण आपला वार्षिक अहवाल सादर करीत आहे.

जून १९८५ साली जनरल एज्युकेशन इन्स्टिट्यूटची प्राथमिक शाळा, कल्याण (प.) मधील सुभेदारवाड्यात सुरू झाली. सध्या शाळेच्या प्राथमिक विभागात १६ वर्ग असून ८८५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. शाळेत एक मुख्याध्यापिका, १६ शिक्षक, १ लेखनिक व १ सेविका कार्यरत आहे. तसेच संस्था पातळीवर १ संगीत शिक्षिका, २ जादा शिक्षक, १ लेखनिक व ५ सेविका कार्यरत आहेत. त्यामुळे शाळेचे शैक्षणिक नियोजन व्यवस्थित होते.

सन २०१४-१५ चे शैक्षणिक वर्ष १६ जून २०१४ पासून सुरू झाले. इ. १ ली ते ४ थी च्या सर्व विद्यार्थ्यांना सर्व शिक्षा अभियानांतर्गत मोफत पाठ्यपुस्तके व कृतीपुस्तिका देण्यात आली.

आपल्या शाळेत गतवर्षापासून इ. १ ली ते इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांना संगणकाचे शिक्षण दिले जाते. इ. १ ली - ३ वर्ग, इ. २ री - ३ वर्ग, इ. ३ री - २ वर्ग, इ. ४ थी चे २ वर्ग सेमी इंग्रजीचे घेण्यात येत आहेत.

**पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल ९५.८३% लागला. आपल्या १५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मिळाली.**
**गुणवत्ता यादीत झळकलेल्या विद्यार्थ्यांची नावे -**

कु. उमा. उ. वैद्य (बोर्डात पाचवी, गुण २७२), कु. उर्शिता चं. चौधरी (बोर्डात १५ वी, गुण २५२), कु. मधुरा अ. ओक (बोर्डात १५ वी, गुण २५२), कु. अवधूत ग. कुलकर्णी (बोर्डात १८ वा, गुण २४६), कु. मयुरेश मु. गुजरे (बोर्डात २२ वा, गुण २३८), कु. प्रचित प्र. संगवई (बोर्डात २३ वा, गुण २३६), कु. साक्षी वैं. रानडे (बोर्डात २३ वी, गुण २३६), कु. सानिका कि. पाटील (बोर्डात २४ वी, गुण २३४), कु. आर्या म. जुवळे (बोर्डात २४ वी, गुण २३४), कु. गार्गी प्र. कर्वे (बोर्डात २४ वी, गुण २३४), कु. समृद्धी सं. जतूकर (बोर्डात २५ वी, गुण २३२), कु. समीक्षा रो. फाले (बोर्डात २७ वी, गुण २२८), कु. आदिती दि. शेवाळे (बोर्डात २८ वी, गुण २२६), कु. स्नेहा ज. विसपुते (बोर्डात २८ वी, गुण २२६), कु. अनुजा का. थापड (बोर्डात २९ वी, गुण २२४).

या विद्यार्थ्यांना सौ. कल्पना पोतदार, सौ. स्मिता फिरके, सौ. ज्योती पवार व सौ. स्वाती शेंडे या शिक्षिकांनी मार्गदर्शन केले.

मराठा मंदिर महाराष्ट्र ज्ञानपीठातर्फे घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल पुढीलप्रमाणे -

गणित इ. ३ री - १००%, कु. वेदांत प्र. जोगी याला ५०/५० गुण प्राप्त झाले.

गणित इ. ४ थी - १००%, कु. उमा उ. वैद्य हिने ९९/१०० मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला.

इंग्रजी इ. ३ री - ९८.११%, कु. सानिका ध. यादव ही ५०/५० गुण मिळवून उत्तीर्ण

इंग्रजी इ. ४ थी - १००%, कु. उमा वैद्य हिने १००/१०० गुण मिळवून गुणवत्ता यादीत प्रथम क्रमांक मिळविला. कु. गार्गी प्र. कर्वे हिने ९९/१०० गुण मिळवून द्वितीय क्रमांक पटकाविला.

महाराष्ट्र प्रज्ञा शोध परीक्षा इ.३ री माहे जानेवारी २०१४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेचा निकाल ९८% लागला असून खालील चार विद्यार्थी गुणवत्ता यादीत झळकले.

कु. पारस दि. सातपुते (जिल्ह्यात ४१ वा, केंद्रात ४ था), कु. कुशल अ. नेवे (जिल्ह्यात ५० वा, केंद्रात ५ वा), कु. श्रेया चं. दुधारकर (जिल्ह्यात ६० वी, केंद्रात ६ वी), कु. शर्वरी सु. व्हावळे (जिल्ह्यात ७४ वी, केंद्रात ७ वी).

या विद्यार्थ्यांना सौ. सुलभा थोरात, सौ. संध्या प्रभाळकर,सौ. दीपा राक्षे व सौ. प्रियंका मराठे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.

दि. ०९ जुलै २०१४ रोजी 'आषाढी एकादशी' असल्याने आदल्या दिवशी इ. १ ली च्या विद्यार्थ्यांची 'दिंडी' कासारहाट मधील श्री विठ्ठल मंदिरात काढण्यात आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये 'सर्व धर्म समभाव' ही संकल्पना रुजविण्यात आली.

दि. १९ जुलै २०१४ रोजी इ. १ ली ते ४ थी च्या वर्गाची पालक सभा घेण्यात आली. एम. पी. एस. व स्कॉलरशीप परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांची सभा घेण्यात आली.

दि. १९ ऑगस्ट ते २३ ऑगस्ट २०१४ या कालावधीत प्रथम घटक चाचणी घेण्यात आली. दि. १० ते १७ ऑक्टोबर २०१४ या कालावधीत प्रथम सत्रांत परीक्षा घेण्यात आली.

शाळेत येणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यावर चांगले संस्कार व्हावेत म्हणून विविध सण, उत्सव साजरे केले जातात. गुरुपौर्णिमा, दहीहंडी, भोंडला, मकरसंक्रांत तसेच राष्ट्राभिमान जागृत होण्यासाठी स्वातंत्र्यदिन, प्रजासत्ताक दिन साजरा करतात. थोर नेत्यांची जयंती व पुण्यतिथी या सारखे कार्यक्रम विविध उपक्रम व स्पर्धा घेऊन साजरे केले जातात.

लो. टिळक पुण्यतिथी साजरी करून त्यानिमित्त वर्गस्तरावर बौद्धिक स्पर्धा घेण्यात आली.

५ सप्टेंबर निमित्त शिक्षक दिन साजरा करून शिक्षकांच्या मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आली. बक्षीसपात्र शिक्षकांची नावे पुढीलप्रमाणे - प्रथम क्रमांक : सौ. दीपा राक्षे, द्वितीय क्रमांक : सौ. कल्पना पोतदार व सौ. स्वाती शेंडे, तृतीय क्रमांक : सौ. संध्या प्रभाळकर, उत्तेजनार्थ : सौ. प्रियंका मराठे. तसेच पंतप्रधान मा. श्री. नरेंद्र मोदी यांचे थेट प्रक्षेपण 'विद्यार्थ्यांशी सुसंवाद' या विषयावर भाषण दाखविण्यात आले.

शिक्षक दिनानिमित्त 'विद्यार्थी झाले शिक्षक' हा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी एक दिवस शाळा चालवून मुख्याध्यापक, शिक्षक, सेवक इ. भूमिका बजावल्या.

स्त्री शिक्षण मंडळातर्फे 'मातृदिनानिमित्त' आईची महती वर्णन करणारे गीत सादर केले. त्यात खालील विद्यार्थ्यांना पारितोषिके मिळाली. कु. स्वरा गणेश अष्टेकर (इ. ३ री, द्वितीय क्रमाक), कु. कस्तुरी विजय नेने (इ. ४ थी, द्वितीय क्रमांक).

'लोकमत स्पोर्ट्स बुक स्पर्धा' बक्षीसपात्र विद्यार्थी - प्रथम क्रमांक - कु. पारस कर्णिक (कॅसिओ), द्वितीय क्रमांक - कु. जान्हवी खंडागळे (प्रवासी बॅग)तृतीय क्र. कु. अंकित कोठावदे (बॅडमिंटन). तसेच ५० विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ बक्षिसे मिळाली.

सकाळ चित्रकला स्पर्धा पुरस्कार प्राप्त विद्यार्थी - 'अ' गट : उत्तेजनार्थ - कु. अनुराग चव्हाण, कु. मयुर आव्हाड. 'ब' गट : प्रथम क्रमांक - कु. विधी पाटील - प्रशस्तीपत्रक व रोख रक्कम रुपये १००/-

दिनांक १२ सप्टेंबर २०१४ रोजी पालक सभा घेण्यात आली.

दि. २५ सप्टेंबर २०१४ , अक्षीकर दिन.

कै. गो. ना. अक्षीकर यांच्या जन्मदिनाचे औचित्य साधून पारितोषिक वितरण समारंभ आयोजित करून इ. ४ थी शिष्यवृत्ती परीक्षा, उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सत्कार व नेने ढाल, सुशांत वैद्य ढाल आणि अग्रवाल ढाल अशी पारितोषिके प्रदान करून विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले.

'बालनाट्य संस्था, डोंबिवली' या स्पर्धेत 'पर्यावरणाच्या नावानं चांगभलं' या बालनाट्याला द्वितीय क्रमांकाचे बक्षीस प्राप्त झाले. लेखनाचे प्रथम क्रमांकाचे बक्षीस कु. स्मितल बनसोडे या शिक्षिकेला मिळाले. तसेच उत्कृष्ट अभिनय कु. चेतस पाटील याला बक्षीस मिळाले. शाळेला सन्मानचिन्ह व रोख रक्कम असे पारितोषिक मिळाले.

दि. ०७ ऑक्टोबर २०१४ रोजी 'आजी-आजोबांसाठी' नक्षत्रांचे देणे कार्यक्रम साजरा करण्यात आला.

शिक्षक-पालक संघातर्फे बालदिनाचे औचित्य साधून विद्यार्थ्यांच्या मनोरंजनात्मक स्पर्धा घेण्यात आल्या. प्रत्येक वर्गातून तीन क्रमांक काढण्यात आले.

ज. ए. इ. चे हायस्कूल कल्याण च्या शतकोत्तर रौप्य महोत्सवानिमित्त 'मनाचे श्लोक' स्पर्धा करण्यात आल्या. यशप्राप्त विद्यार्थी कु. साक्षी जोशी, तृतीय क्रमांक, प्रशस्तीपत्रक व ट्रॉफी, उत्तेजनार्थ कु. कस्तुरी नेने.

बालक मंदिर संस्था, कल्याण तर्फे हस्ताक्षर स्पर्धेचे बक्षीसपात्र विद्यार्थी - गट क्र. १ - हस्ताक्षर स्पर्धेमध्ये द्वितीय क्रमांक कु. धनश्री ढोणे, उत्तेजनार्थ कु. कस्तुरी पवार गट क्र. २ मध्ये हस्ताक्षर कु. मयुर आव्हाड. चिन्मय मिशन - गीता पठण स्पर्धेतही विद्यार्थी सहभाग चांगला असतो. यात यशस्वी झालेले विद्यार्थी पुढीलप्रमाणे - 'ब' गट - इ. १ ली व २ री - कु. निधीश्री रिसबूड (तृतीय क्रमांक), कु. ऋतुजा चिंचणसुरे (उत्तेजनार्थ) आणि 'क' गट - इ. ३ री व ४ थी - कु. साक्षी जोशी (प्रथम क्रमांक), कु. सुस्मित वैद्य (उत्तेजनार्थ), कु. प्रथमेश कुलकर्णी (उत्तेजनार्थ)

जायन्ट्स ग्रुप ऑफ, कल्याण हस्ताक्षर स्पर्धेत विद्यार्थीनींचा सहभाग असतो.

कॅमलिन स्पर्धेसाठी गट क्र. १ व २ मधून एकूण ९ चित्रे निवडण्यात आली.

नवनीत चित्रकला स्पर्धेत विद्यार्थी सहभागी झाले होते.

संत राममारुती पुण्यतिथी उत्सवानिमित्त दरवर्षीप्रमाणे यावर्षीही इ. ४ थी च्या विद्यार्थ्यांनी अथर्वशीर्ष पठण केले.

सर्व शिक्षा अभियनांतर्गत महत्त्वाच्या दिवसाचे आयोजन केले होते. बालस्वच्छता मोहिम अभियान दि. १४ नोव्हेंबर ते १९ नोव्हेंबर २०१४, २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. स्वच्छ भारत व स्वच्छ विद्यालय हा उपक्रम दि. २५ नोव्हेंबर ते ३१ ऑक्टोबर २०१४ असा राबविण्यात आला.

दिनांक ८ मार्च २०१४ रोजी महिला दिनानिमित्त सर्व शिक्षकांस डॉ. लोहार भगिनी व पत्रकार सौ. सुचेता करमरकर यांचे व्याख्यान आयोजित केले.

महापौर सिकई चषक स्पर्धा - २०१४ यामध्ये इ. ३ री मधील कु. मनिष जगदिश भोईर याला रौप्य पदक देऊन सन्मानित करण्यात आले. महाराष्ट्र युवा संघ, कल्याण आयोजित कराटे स्पर्धेत कु. मनिष भोईर हा यलो बेल्ट वी मिळवून यशस्वी झाला. तर्फे घेण्यात आलेल्या स्पर्धेत कु. मनिष भोईर याने द्वितीय क्रमांक पटकाविला. तर्फे झालेल्या स्पर्धेत कु. मनिष भोईर याला कास्य पदक व प्रशस्तीपत्र मिळाले.

सोहम फाउंडेशन तर्फे पोल मल्लखांब स्पर्धेत कु. अधिराज ढेरे यांने प्रथम क्रमांक पटकाविला. रोप मल्लखांब स्पर्धेत कु. निधीश्री रिसबुड या विद्यार्थीनीने द्वितीय क्रमांक पटकावला.

कोयना साप्ताहिक वृत्तपत्र आयोजित बालमहोत्सव चित्रकला स्पर्धेत कु. साईराज दूरगुडे याला प्रथम क्रमांक मिळाला. त्यास ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

महाराष्ट्र शासन क्रीडा युवक सेवा संचलन तसेच क्रीडा परिषद व क. डों. म. पा. जिल्हास्तरीय फ्री स्टाईल जलतरण स्पर्धेत कु. डॉली पाटील ही विद्यार्थीनी १०० मी, २०० मी, ४०० मी. या स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांकाने विजयी झाली.

क. डों. म. पा. तर्फे आयोजित केलेल्या विज्ञान प्रदर्शनात 'शेवंतीच्या फुलापासून कीटकनाशक तयार करणे' हा विषय घेऊन शाळेतील सहशिक्षिका सौ. ज्योती पाटील व सौ. प्रमिला राठोड यांनी शाळेच्या वतीने सहभाग घेतला. तसेच कु. निहार पाटील व कु. भूमी मागाडे या विद्यार्थ्यांचाही त्यात सहभाग होता.

श्री समर्थ साई सेवाभावी संस्था, बीड आयोजित शालेय जिल्हास्तरीय विविध स्पर्धेत ६३९ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. कु. ज्ञानेश्वरी भगत (रंगभरण), कु. विशाखा म्हात्रे (हस्ताक्षर), कु. हर्षद बापट (निबंध) या विद्यार्थ्यांना उत्तेजनार्थ पारितोषिके मिळाली. त्यांना प्रशस्तीपत्रक, रोख रु. ५०/-, ट्रॉफी व मेडल देण्यात आली.

अथर्व ट्रस्ट, डोंबिवलीने आयोजित केलेल्या विविध स्पर्धांमध्ये शाळेतील इ. १ ली ते ४ थी चे ७४५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतर्फे बालमहोत्सव २०१४ साजरा झाला. यात बालनाट्य स्पर्धेत पर्यावरणाच्या नावानं चांगभलं या नाटकाला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. तर कु. प्रियांका कपिल वारघडे हिला अभिनयाचे तृतीय तर कु. चेतस सुभाष पाटील व मंथन सुधाकर राऊळ यांना उत्तेजनार्थ पारितोषिक प्राप्त झाले. तसेच या नाटकाला नेपथ्याचे तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

बालमहोत्सव २०१४ यात समूहनृत्य स्पर्धेत तृतीय क्रमांक आला. तर उकृष्ठ नर्तक म्हणून कु. स्वयंम बहाडकर यास प्रथम व कु. मितेश अरुण पगारे यास द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. नृत्याचे दिग्दर्शन सौ. दीपा दीपक राक्षे यांनी केले.

बालमहोत्सव २०१४ मध्ये समूहगायन या स्पर्धेत शाळेला तृतीय क्रमांकाचे पारितोषिक मिळाले. या स्पर्धेसाठी गीत सौ. शमिका कांचन खटावकर यांनी बसविले होते. दिग्दर्शनाचे पारितोषिक कु. स्मितल बनसोडे हिला मिळाले.

शाळेचे वाचनालयात शिक्षक, पालक व विद्यार्थी यांच्यासाठी सुमारे ३००० चांगल्या दर्जाची पुस्तके असून त्याचा लाभ घेतला जातो. ज्या पालकांना वाचनालयाचा लाभ घ्यायचा आहे, त्यांनी रु. १००/- अनामत रक्कम भरून सभासद व्हावे. वाचनालयासाठी नेहमीच पालकांचा व विद्यार्थ्यांचा चांगला सहभाग लाभला आहे.

शिक्षक-पालक संघ व शाळा व्यवस्थापन समितीमधील पालक प्रतिनिधींचे शाळेच्या प्रगतीसाठी वेळोवेळी साहाय्य लाभत असते.

पालक आपल्या पाल्याच्या वाढदिवसानिमित्त रु. ५१/- पासून रुपये ५०१/- पर्यंत देणगी देतात. त्या देणगीतून शाळेला आवश्यक असणारे शैक्षणिक साहित्य घेतले जाते.

शाळेवरील प्रेमापोटी काही हितचिंतक, माजी पालक यांनी इलेक्ट्रिक पंखे, इन्व्हर्टर भेट दिले आहेत.

अशाप्रकारे विशाल वटवृक्षाला समृद्धी व यशाच्या उत्तुंग शिखराकडे वाटचाल करण्यासाठी संस्था व शिक्षक सतत प्रयत्न करीत आहेत. त्यांना यश मिळो ही ईश्वरचरणी प्रार्थना!

धन्यवाद!

**सौ. प्रज्ञा प्रमोद मोने**
मुख्याध्यापिका,
ज. ए. इ. ची प्राथमिक शाळा(सुभेदारवाडा)

संकलन :
सौ. संध्या प्रभाळकर
(साहाय्यक शिक्षिका)